साप्ताहिक

# सामाजिक आढावा

PRGI No.: MHMAR/25/A3777 E-mail : samajikaadhawa@gmail.com

वर्ष : 1 ले, अंक : 1 शनिवार, दिनांक : 06 डिसेंबर 2025 ते 12 डिसेंबर 2025 संपादक : विनायक वि. कालेकर मूल्य : 5 रूपये पाने 4



1) BA (Bombay University)
2) MA (Columbia University)
3) MSc (London School of Economics)
4) DSc (London School of Economics)
5) PhD (Columbia University)
6) LLD (Columbia University)
7) LLD (Osmania University)
8) LLD (Nagpur University)
9) D.Litt. (Osmania University)
10) D.Litt. (Banaras Hindu University)
11) D.Litt. (Aligarh Muslim University)
12) D.Litt. (Columbia University)
13) D.Litt. (Nagpur University)
14) Barrister-at-Law (Gray's Inn, London)
15) BA (University of Bombay)
16) MA (University of Bombay)
17) MA (University of Columbia)
18) DSc (University of London)
19) LLD (University of London)
20) DSc (University of Bombay)
21) LLD (University of Bombay)
22) DSc (University of Nagpur)
23) LLD (University of Nagpur)
24) DSc (University of Punjab)
25) LLD (University of Punjab)
26) LLD (University of Karnataka)
27) LLD (University of Kerala)
28) LLD (University of Baroda)
29) LLD (University of Mysore)
30) LLD (University of Sagar)
31) LLD (University of Rangoon)
32) LLD (University of Osmania)

**३२ शैक्षणिक पदवी मिळविणारे**

भारतरत्न

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त

साप्ताहिक समाजिक आढावा तर्फे शत: शत: नमन

शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा

# संपादकीय...

लिहणे आणि वाचन हे भारत देशात फार पूर्वी पासून प्रचलित आहे. ज्यामध्ये ग्रथां पासून अनेक लिखाण सामुग्री उपलब्ध आहे. ज्याच्या मुळेच भारत देशाची संस्कृती द्विगुणीत होत गेली. राजेशाही पध्दतीमध्ये देखील लिखाण, रोजनीशी, बारनीशी, असे लिहून जतन करण्याची पध्दत पूर्वापार पासून चालत आली आहे.

भारत देश जसा पारतंत्र्यात गेला तेव्हा देखील स्वतंत्रलढ्यात अनेक क्रांतीकारी, देशभक्त, वैचारीक मंडळी, यांनी जसे वेगवेगळ्या पध्दतीने योगदान दिले. तसेच योगदान फार मोठ्या प्रमाणात पत्रके, वृत्तपत्रके, साप्ताहिक, दैनिक यांचे होते. ब्रिटीशांच्या जुलमी हुकुमशाही च्या अक्षरक्षः चिंधड्या याच वृत्तपत्रकांच्या माध्यमातून करण्यात आल्या. त्यातूनच सामाजिक चळवळ उभी राहीली आणि चलेजाव चा नारा संपूर्ण भारत देशात दुमदुमू लागला.

विविधतेने नटलेल्या भारत देशात अनेक भाषांची रेलचेल असून देखील, याच वृत्तपत्रां मार्फत एखादा संदेश, विचार संपूर्ण देशात पसरविला जायचा त्यावेळेस सामान्य जनतेपासून उच्चभ्र लोकांपर्यंत सर्व देशवासी या वृत्तपत्रांची आवर्जुन वाट बघत असे.

भारतीयांच्या विचारांना याच वृत्तपत्रांमार्फत वैचारीक धार मिळत होती. अनेक वृत्तपत्र मालकांनी तोट्यात असून देखील हा विचारयज्ञ चालूच ठेवला होता. कालांतराने भारतदेश स्वातंत्र झाला. त्यामध्ये मोलाचा वाटा हा वृत्तपत्रांचा होता.

आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन याच दिवशी एक मोठा विचार आपल्या संपूर्ण भारतीयांमध्ये रूजला गेला की योग्य विचार आणि योग्य शिक्षण या दोनही गोष्टीमुळे सामान्य माणासाचा महामानव होतो. संपूर्ण आयुष्यात ३२ शैक्षणिक पदवी मिळविणारे आणि त्या पदव्युत्तर शिक्षणाचा फायदा हा सर्व भारतीय सामाजासाठी, न्याय व्यवस्थेसाठी करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले.

संपूर्ण समाजाचा सांगोपांग विचार करूनच संविधान या राष्ट्र ग्रंथाची निर्मिती केली. याच डॉ. बाबासाहेबांच्या विचारांमुळे भारतात राजेशाही, हुकुमशाही, घराणेशाही, निजामशाही, यांना धूळ चारत लोकाशाही ची सुरूवात झाली...

लोकांनी, लोकांच्या हितासाठी, लोकांनीच चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही.. असे अब्राहम लिंकन यांचे मत आहे. हीच लोकाशाही, शासन, प्रशासन, न्यायपालिका, व प्रेस (मिडीया) या चार मुलभूत आधारस्तंभावर उभारलेली आहे.

त्यामध्ये वृत्तपत्र, प्रेस, प्रिंट मिडीया यामुळे २०१० पर्यंत भारतदेशात एक वैचारीक क्रांती अनुभवायला मिळाली. पत्रकार, संपादक यांना समाजात एक महत्वाचे स्थान होते. सामान्य माणूस हा त्याच्या अडीअडचणीं अन्याय, पत्रकारांना आवर्जुन सांगत असे. परंतु २०१० नंतर जे काही इंटरनेट क्रांती झाली त्यामुळे सोशल मिडीया चे पेव फुटले आणि ज्यांना जसे वाटते तसे सर्वजण अभिव्यक्ती स्वांतत्र्याच्या नावाखाली सोशल मिडीयावर व्यक्त होऊ लागले.

आज याच सोशल मिडीयाचा विळखा संपूर्ण समाजाला जो काही घट्ट बसला आहे. त्याचे विपरीत परीणाम बघायला मिळत आहेत. समाजातील लोक आजूबाजूला काय चालले या पेक्षा, बाहेरील जगात काय चालू आहे यातच जास्त गुंतून गेली आहे. या सोशल मिडीयाचे व्यसन संपूर्ण समाजाला गिंळकृत करत आहे. अगदी लहान मुलांपासून ते वयोवृध्दांपर्यंत सर्वजण मोबाईल मध्ये अडकले आहेत. त्याचाच परीणाम असा झाला आहे की ज्याचे लाईक, शेअर, फॉलोवर जास्त त्याचे म्हणणे योग्य वाटायला लागले आहे. त्याची शहानिशा कोणीही करत नाही. चुकीचे आहे का बरोबर हे कोणीच बघत नाही. त्यामध्ये भरीसभर म्हणा की आता ए आय नावाचे नविन भूत हे समाजात पसरायला लागले आहे. जशी जशी आधुनिकतेकडे समाज जात आहे, तशी तशी त्याची मानसिक आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता वाढत आहे.

त्यासाठीच कमी होत असलेला वाचक वर्ग आणि त्यातच वाढणार प्रिंटीगचा खर्च यासर्व गोष्टींचा विचार करून आमचा पहिला अंक आम्ही आज प्रकाशित करत आहोत. आम्हाला माहीत आहे की याची व्याप्ती पहिल्यासारखी वाढणार नाही, तरीही आधुनिकतेकडे वाटचाल करत योग्य वेळेस योग्य प्रगती आम्ही नक्कीच करू. हा दृढविश्वास आम्हाला आहे....

# भारतीय संविधान
## आपले अधिकार आणि कर्तव्य

**आम्ही भारताचे लोक...**

या महत्त्वपूर्ण वाक्याने सुरू होवून भारतीयांनाच अर्पण केलेले आपले जगातील सर्वात महान आणि आदर्शदायी संविधान आपल्या देशाला लाभलेले आहे. त्याने भारताची एकात्मता,प्रेम, बंधुता, न्याय, समता, स्वातंत्र्य वाढवून भारतीयांच्या मनात 'मानवता' रुजवली आहे.

२६ नोव्हेंबर म्हणजेच 'संविधान दिन' संपूर्ण भारत देशात साजरा होत असतो. या संविधानास पंचाहत्तरी पूर्ण झाली आहे. या निमित्त आपण संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. त्यामुळे हे वर्षे महत्त्वपूर्ण आहे.

शासन स्तरावरसुद्धा हा संविधान अमृतमहोत्सवी कार्यक्रम 'घर घर संविधान' राबवून साजरा करण्यात येत आहे.यानिमित्ताने संविधान हे समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहचत आहे.

संविधानाचा उद्देश, महत्त्व, आपले मूलभूत अधिकार, कर्तव्य, जबाबदारी याची ओळख भारतीयांना होणार आहे. आपले संविधान काय आहे.? याविषयी थोडक्यात माहिती पाहू या

भारताचे गणराज्य हे जगातील सर्वात मोठे लोकशाही प्रजासत्ताक आहे. अनेक प्रकारचे पराकोटीचे भेदाभेद व विलक्षण विविधता असताना सुध्दा सुमारे १५० कोटी लोक एकाच विधी विधानानुसार अनुशासित केले जातात. हे विधी विधान म्हणजेच **भारताचे संविधान** होय. हे संविधान विश्वातील वाचकांसाठी हे आदर्शवत ठरले आहे. याची महानता जगाने मान्य केली आहे.

या जगोत्कृष्ट स्वतंत्र भारताच्या संविधान निर्मिती कार्यास ९ डिसेंबर १९४६ सुरुवात झाली. त्यासाठी संविधान सभेची स्थापना करून निवडणूक पद्धतीने सदस्य निर्वाचित केले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बंगालमधून निवडून गेले.

पण त्या प्रांताचे विभाजन झाल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे संविधान सभेचे सदस्य राहिले नाहीत. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत आणि विविध समित्यांवर त्यांची नियुक्ती झाली होती, त्या समित्यांवर त्यांनी जे कार्य केले, त्यांनी जे योगदान दिले ते एवढे श्रेष्ठ दर्जाचे होते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सोबत घेतल्या शिवाय स्वातंत्र्याचे दृढीकरण आणि विधीनियमीकरण सुलभ होणार नव्हते. म्हणून काँग्रेस पक्ष पुढे येवून त्यांनी १९४७ च्या जुलै महिन्यात डॉ. आंबेडकर यांना संविधान सभेवर पुनर्निर्वाचीत केले. लगेच १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य दिनी प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांनी त्यांना मंत्रीमंडळात सामिल करून घेतले आणि त्यांना भारताचे पहिले कायदा मंत्री केले. २९ ऑगस्ट रोजी श्री. सत्यनारायण सिन्हा यांनी मांडलेल्या ठरावा प्रमाणे सात सभासदांची निवड करण्यात आली. त्यात ३० ऑगस्ट रोजी संविधान सभेने एकमताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड केली.

पुढील सात सदस्य-
१)अल्लादी कृष्णस्वामी अय्यर २)एन. गोपालस्वामी अयंगार ३)डॉ. बी. आर. आंबेडकर ४) श्री. के.एम.मुन्शी ५) सैयद मोहमद सादुल्ला ६) बी.एल.मित्तल ७) डी.पी.खेतान

संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी एक पत्र डॉ. आंबेडकर यांना पाठविले. त्यात ते म्हणाले की, संविधान सभेची बैठक डिसेंबर महीन्यात होणार आहे, त्यामुळे रावांचा ड्राफ्ट सर्व सदस्यांना वितरित करावा, त्यावर डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, असे करण्याची गरज नाही. कारण हा ड्राफ्ट व उपसमित्यांचे रिपोर्ट लक्षात घेऊन संविधानाचा नवीन मसुदा तयार करायचा आहे. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी कार्यालयाने तयार केलेल्या मसुद्यातील सर्व कलमांचे निरिक्षण करुन चर्चेअंती त्यात कोणते कलम बदलावे, कोणते वाढवावे यावर निर्णय घेऊन स्वतः ची शब्द रचना असलेली कलमे तयार केली.

जानेवारी १९४७ ला उद्देश पत्रिका तयार करण्यात आली. त्यामध्ये उद्घघोषीत करण्यात आले की, भारत एक सार्वभौम, स्वतंत्र गणराज्य असेल. मसुदा समितीने सार्वभौम लोकसत्ताक गणराज्य असा शब्द स्वीकारलेला आहे. कारण 'सार्वभौम' या शब्दामध्ये स्वातंत्र्य अंतर्भूत आहे. उद्दिष्टबाबतच्या ठरावात अंतर्भूत नसला तरी समितीने बंधुत्वाच्या परिच्छेदाचा उद्देश पत्रिकेत अंतर्भाव केला आहे. बंधूभावाची आणि सदिच्छेची गरज भारताला आज जेवढी आहे, तेवढी पूर्वी कधीही नव्हती आणि नवीन संविधानात या विशेष ध्येयाचा उद्देश पत्रिकेत खास उल्लेख करुन त्यावर भर देण्याची गरज समितीला वाटली.

थोडक्यात अनुच्छेदांचा परिचय असा: अनुच्छेद १ मध्ये भारताचे वर्णन, अनुच्छेद ५ आणि ६ मध्ये नागरिकत्व, अनुच्छेद ७ ते २७ मध्ये मूलभूत अधिकार, अनुच्छेद ५९ संघराज्याच्या राष्ट्रपतीचे अधिकार, अनुच्छेद ६० सामायिक सूचीतील विषयांबाबत कार्यकारी अधिकार, अनुच्छेद ६७ राज्य सभेचे गठन, अनुच्छेद ६३ ते १५१ केंद्रीय संसद आणि राज्य विधीमंडळांची कालमर्यादा, अनुच्छेद १०७ ते २०० सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये, अनुच्छेद १३१ राज्यपालांच्या निवडीची प्रक्रिया, अनुच्छेद १३८ उपराज्यपाल, अनुच्छेद २१२ ते २१४ केंद्र शासित क्षेत्रे, अनुच्छेद २१६ ते २३२ वैधानिक अधिकारांची विभागणी, अनुच्छेद २४७ ते २६९ वित्तीय तरतुदी, अनुच्छेद २८१ ते २८३ सेवा, अनुच्छेद २८९ ते २९१ निवडणूक, मतदान हक्क इत्यादी, अनुच्छेद ३०४ संविधान दुरुस्ती, अनुच्छेद २९२, २९४ आणि ३०५ अल्पसंख्यांकाना संरक्षण तसेच परिशिष्ट पहिले भाषावार प्रांत व परिशिष्टे ५ व ६ अनुसूचित जमाती, अनुसूचित क्षेत्रे आणि जमाती क्षेत्रे.

हा संविधानाचा मसुदा दिनांक २६ फेब्रुवारी १९४८ ला भारत सरकारच्या गँझेटमध्ये लोकांच्या माहितीसाठी व लोकांची मते जाणून घेण्यासाठी प्रकाशित करण्यात आला. लोकांपुढे तो जवळपास आठ महिने होता. संविधान निर्माण प्रक्रियेचे दर्शक दिर्घेतून सुमारे ५३,००० हजार दर्शकांनी अवलोकन केले. तर यावर जवळजवळ ७,७३५ उपसूचना सुचविण्यात आल्या. पैकी २,४७३ उपसूचना प्रत्येक्ष सभागृहापुढे चर्चेसाठी मांडण्यात आल्या. तर २२ नोव्हेंबर १९४९ पर्यंत संविधानावर ६३,९६,७२९ रु. खर्च झाला होता. या घटना समितीच्या कार्यास २ वर्षे ११ महिने आणि १७ दिवस लागले. याकाळात घटना समितीची एकूण ११ अधिवेशने झाली. त्यापैकी ६ अधिवेशने उद्दिष्टांचा ठराव आणि मूलभूत हक्क व केंद्राची घटना, केंद्राचे अधिकार, प्रांतिक घटना, अल्पसंख्य जमाती, शेड्यूल्ड विभाग व शेड्युल्ड जमाती यासंबंधीचे रिपोर्ट पास करण्यात खर्ची पडलेले आहेत. उरलेली ५ अधिवेशने घटना मसुद्याच्या विचाराकरीता उपयोगी पडलेली आहेत. या घटना मसुद्यात एकूण ३९५ कलमे आणि ८ परिशिष्टे आहेत.

४ नोव्हेंबर १९५० रोजी हे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेला सादर करताना दिलेले भाषण देशाच्या आणि जगाच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्वपूर्ण दर्जा प्राप्त झाला आहे. याचाच परिणाम म्हणून सदस्यांनी डॉ. आंबेडकरांची एक व्यासंगी, घटनेचा सखोल अभ्यासक, अधिकार वाणीने संविधानावर भाष्य करणारा, संविधान निर्मितीची क्षमता असणारा संविधानकार अशी प्रशंसा केली आहे.

२४ जानेवारी १९५० संविधानाच्या तीन प्रती चित्रकाराने कलाकृतींनी अलंकृत केलेली मराठी, हिंदी आणि इंग्रजी सभेच्या पटलावर ठेवण्यात आल्या. त्यावर सह्या झाल्या आणि राष्ट्र गीत आणि वंदेमातरम चे गायन होवून संविधान निर्मात्री सभेचे कार्य पूर्ण झाले. २६ नोव्हेंबर १९५० रोजी तिचे भारतीय गणराज्याच्या कार्यवाहू संसदेत रुपांतर झाले. यातून देशालाच नाही तर जगाला समता, बंधुता, स्वातंत्र्य आणि न्याय देणारी महान मानवतावादी मूल्ये मिळाली. तसेच हीच मूल्ये देशात एकात्मतेचे दर्शन घडवतील. ही ग्वाही मिळाली. २६ जानेवारी १९५० रोजी भारत देश संविधान आत्मर्पित सार्वभौम लोकशाही गणराज्य घोषित झाले.

आज स्वातंत्र्यास ७५ वर्षे झाली. सर्व जाती, धर्म व पंथ सुखसमाधानाने एकत्र नांदत आहेत. हे याच संविधानाचे यश आहे. लोकशाहीची महानता आहे. लोकशाहीचा महत्त्वपूर्ण संदेश सांगताना डॉ. आंबेडकर म्हणतात, "लोकशाही म्हणजे नकारशक्ती आहे. अनुवांशिक अधिकार किंवा स्वयंसत्ताक अधिकार यांचा प्रतिशोधक म्हणजे लोकशाही. ज्यांची देशावर सत्ता आहे त्यांच्या अधिकारावर कोठेतरी, केंव्हा तरी नकाराधिकार वापरणे म्हणजे लोकशाही. स्वयंसत्ताक राज्य व्यवस्थेत नकाराधिकार नसतो. राजाची एकवेळ नियुक्ती झाल्यानंतर अनुवंशिक किंवा दैवी अधिकार म्हणूनच तो राज्य करतो. परंतू लोकशाहीत जे सत्तेवर असतात त्यांना प्रत्येक पाच वर्षांनी जनतेला विचारावे लागते की, जनतेच्या मताप्रमाने त्यांच्या हिताची काळजी घेण्यासाठी, त्यांचे संरक्षण करण्यासाठी व त्यांच्या जीवनात बदल घडविण्यासाठी सत्ता व अधिकार संपादण्यास ते लायक आहेत काय? यालाच मी नकाराधिकार म्हणतो. सत्ताधाऱ्यांनी पाच वर्षाच्या शेवटी जनतेपर्यंत जावे व मधल्या काळात सत्ताधाऱ्यांना जाब विचारणारे कोणी नसावे, या पंचवार्षिक नकाराधिकाराने लोकशाहीचे समाधान होत नाही. लोकसत्तेच्या पाच वर्षाच्या दिर्घकालीन नकाराधिकाराशीच केवळ शासनाची बांधिलकी नसते, तर तात्काळ नकाराधिकाराची लोकशाहीला फार आवश्यकता असते." हा मोलाचा संदेश कोणत्याही काळात तितकाच महत्त्वाचा आहे, तसा तो सद्यस्थितीही महत्त्वाचा आहे.

या आदर्शवादी लोकशाहीची जबाबदारी ही आपल्या प्रत्येक नागरिकांवर आहे. तसेच आपले कर्तव्य आहे. तीचे काटेकोरपणे पालन करणे व लोकशाहीचे संरक्षण करुन ती वृद्धिंगत कशी होईल, याची काळजी आपणास घ्यावयाची आहे. यातून भारतीयांचे आपलेपण, प्रेमभावना, बंधुभाव, मैत्रीभाव जपल्या जाईल. ऐक्य वाढीस लागेल व भारतीय एकात्मता वृद्धींगत होईल. हीच भारताची महासत्ताकाची वहिवाट असेल. यातूनच भारत देश समृद्ध शाली देश होईल. तसेच सुजलाम सुफलाम होईल.



**लेखन : बाबुराव चो. पाईकराव**
एम.ए., बी.एड
मु.पो. डोंगरकडा, ता. कळमनुरी,
जि. हिंगोली
मो.नं.: ९६६५७११५१४

**साप्ताहिक सामाजिक आढावा च्या प्रथम अंकास माझ्याकडून हार्दीक शुभेच्छा**

**सामाजिक आढवा** हे साप्ताहिक **मालक व प्रकाशक :** विनायक विलास कालेकर यांनी **मुद्रक :** सारस्वत आर्टस् ॲन्ड प्रिंटस्, ४६७ बुधवार पेठ, पासोड्या विठोबा मंदिराजवळ, तपकीर गल्ली, इलेक्ट्रिक मार्केट, पुणे ४११००२. महाराष्ट्र येथे छापून ४६७ बुधवार पेठ, पासोड्या विठोबा मंदिराजवळ, तपकीर गल्ली, पुणे ४११००२, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. न्यायलयीन कार्यक्षेत्र **पुणे न्यायालय** राहील **संपादक : विनायक विलास कालेकर, मोबाईल : ९८९०३३६०११**

Weekly **SAMAJIK AADHAWA** Published by Owner Mr. Vinayak Vilas Kalekar **Printed at Saraswat Arts and Prints**, 467 Budhwar Peth, Near Pasodya Vithoba Mandir, Tapkir Galli, Pune : 411002, Maharashtra And Published at 467 Budhwar Peth, Near Pasodya Vithoba Mandir, Tapkir Galli, Electric Market, Pune 411002, Maharashtra.Subject to Pune Jurisdiction **Editor** : Vinayak Vilas Kalekar **E-mail** :samajikaadhawa@gmail.com | **Website** : www.samajikaadhwa.com | **Contact** 9890336011 | **PRGI : MHMAR/25/A3777**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्राणीप्रेम

डॉ. दिलीप लोखंडे, साक्री, जि. धुळे, मो. ८३८०८९९७८५

समस्त भारतवर्षाला आणि जगाला सुपरिचित व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. हा त्यांचा परिचय 'समाज क्रांतीकारक' म्हणून असला तरी त्यांच्या असामान्य बुध्दीमतेने, त्यांच्या गाढ व्यासंगाने त्यांच्या जीवनाचे अनेक पैलू अनेक लेखकांनी प्रकाशित केलेले आहेत. परंतु बाबासाहेबांच्या प्राणी प्रेमाविषयी कुठेही वाचायला मिळत नाही म्हणून हा लेख प्रपंच.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या श्वान प्रेमाविषयी पहिला पुरावा असा देता येईल की, ते राजगृहात वास्तव्यास आले त्यावेळी त्यांनी आपल्या कुटुंबियांसमवेत काढलेला फोटो हेच. पत्नी, पुत्र, पुतण्या, भावजयी यांच्यासोबत मध्यभागी बसलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या काळ्या रंगाच्या टॉबी नावाच्या कुत्र्याला सोबत घेऊन आपला फोटो काढून घेतलेला आहे. मुंबई उच्च न्यायालयात प्रॅक्टिस करीत असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संध्याकाळी घरी परत येत असतांना दादरच्या कोपऱ्यांवर आजही उभ्या असलेल्या डी. दामोदर मिठाई वाल्याच्या दुकानातून मुलगा आणि पुतण्या यांच्यासाठी मिठाई तसेच आपल्या आवडत्या टॉबीला आवडणारी जिलेबीही आठवणीने ते घेत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कुत्र्याच्या सवयी, त्याचे गुणधर्म, त्याचे स्वभाव या साऱ्या गोष्टींचे बारीक सारीक ज्ञान होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सुरूवातीच्या काळातील एक सहकारी डी. आर. प्रधान यांनी त्यांची श्वान प्रेमाविषयीची आठवण सांगितली आहे, ते म्हणतात, बाबांचा टॉबी कुत्रा मेला, तेव्हा ते धाय मोकलून रडत होते. कुत्र्यासाठी रडणारे साहेब पाहून मला हसू येत होते. पण ते दाबून आम्ही साहेबांच्या शोकात गप्प उभे राहून सहभागी झालो होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मंत्रीमंडळात असताना त्यांच्याजवळ कॉकस स्पॅनियर जातीचा उंच, धिप्पाड अमेरिकन वंशावळीतील जातीवंत कुत्रा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याचे नाव पीटर असे ठेवले होते. पीटरला जसा बाबासाहेबांचा लळा होता, तसाच बाबासाहेबांना पीटर आवडत असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर बाहेरगावी गेले तर पीटरविषयी विचारणा करणारी त्यांची बरीच पत्रे स्वीय सहाय्यक रत्तुकडे आलेली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिल्लीतील पंडित हाऊस या भव्य बंगल्यात साहेब येणाऱ्या व्यक्तीचे शेपटी हलवून पीटर स्वागत करीत असे अतिपरिचियाची व्यक्ति असली म्हणजे पीटरचे कंबरेसह शेपटी हलवणे सुरू होई. मात्र अनोळखी चेहरा दिसला की, त्याचे जोरजोरात भुंकणे सुरू होई. त्यामुळे समोरच्या व्यक्तीची त्यांचा पीटर त्यांच्या अवतीभवती कधी शेपटी हलवित तर कधी कुहीकुही असा आवाज काढत फिरत राही. बंगल्याला सभोवताली विस्तीर्ण बाग होती. बंगल्याला साजेसे असे भव्य गेट होते. गेट बंगल्यापासून बऱ्याच अंतरावर होते. पण इतक्या लांबवरचे गेट उघडण्याचा आवाजही पीटरला ऐकू येई, मोटारगाडी आत घुसो की कोणी चालत येवो ते पाहण्यासाठी गेटमधून पीटरची स्वारी धावत व्हरांड्यात येई.

तो व्हरांड्यात आला की, त्याचे दोन्ही कान काटकोनात उभे राहत असत. सदोदित येणाऱ्या व्यक्तीचे शेपटी हलवून पीटर स्वागत करीत असे. अतिपरिचियाची व्यक्ति असली म्हणजे पीटरचे कंबरेसह शेपटी हलवणे सुरू होई. मात्र अनोळखी चेहरा दिसला की, त्याचे जोरजोरात भुंकणे सुरू होई. त्यामुळे समोरच्या व्यक्तीची पीटरचे ते भारदस्त रूप पाहून तारांबळ उडत असे. बाबासाहेब रात्री जागून लिखाण अथवा वाचन करत असत तोपर्यंत पीटर जागत. मालक झोपून गेले की, पीटरही त्याच्यासाठी पलंगाजवळ ठेवलेल्या अंथरूणावर अंग टाकीत असे. बाबासाहेब कामावर जाण्यासाठी तयार होऊन आपल्या मोटारीकडे निघाले की, पीटर माई साहेबांसोबत मालकांना निरोप देण्यासाठी हजर राहत असे. त्यावेळी पीटरचे जोरजोरात शेपटी व कंबर हलविणे आणि कुहीकुही करून मलाही सोबत न्या अशी मालकाकडे विनवणी सुरू होई

त्याची समजूत काढीत आणि लाडाने, प्रेमाने बोलत, पण बाबासाहेबांना हे सर्व कळत असे म्हणून आधी ते त्याचा हट्ट वाढला की, रागावून त्याला ऑर्डर करीत I say go inside मग त्याचा नाईलाज होई, तो धन्याची गाडी जाईपर्यंत तेथेच उभा राही.

सारांश रूपाने, असे म्हणता येईल की, सद्यःस्थितीत उपयोगी पडणाऱ्या जनावरांविषयी अनास्था निर्माण झाली आहे. वय झाले, काम संपले की त्यांच्याविषयी कृतज्ञता वाटत नाही. घरच्या सदस्याप्रमाणे खूप वर्षे आपल्या कुटुंबात राहून सुख-दुःखात सहभागी झालेल्या मुक्याप्राण्यांचा तिरस्कार करणे हे मानवतेला धरून नाही



# ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन

कालेकर श्रीवल्लभ वसंत
मो.: ९५१८९७२९४७, तळेगाव दाभाडे






महापरिनिर्वाण म्हणजे नक्की काय याचा अर्थ पहाण्याचा प्रयत्न केला तर जाणवते की हा एक संस्कृत शब्द आहे ज्याचा अर्थ मृत्यूनंतरची मुक्ती किंवा अंतिम मोक्ष असा होतो. बौद्ध धर्मात वर्णन केल्याप्रमाणे, कुशीनगरमध्ये ८० व्या वर्षी भगवान बुद्धांच्या निधनाचा संदर्भ सापडतो आणि त्यालाच येथे महापरिनिर्विाण हा शब्द वापरण्यात आल्याचे दिसते. याचाच अर्थ महापरिनिर्वाण हा शब्द बौद्ध संकल्पनेतून आला आहे. बौद्ध धर्मानुसार, ज्या व्यक्तीने निर्वाण प्राप्त केले आहे (सर्व सांसारिक वासना आणि जीवनचक्रातून मुक्ती मिळवली), त्याच्या मृत्यूनंतर 'महापरिनिर्वाण' झाले असे मानले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती, त्यामुळे त्यांच्या पुण्यतिथीसाठी हा शब्द वापरला जातो. ६ डिसेंबर हा दिवस महापरिनिर्वाण दिन म्हणून साजरा केला जातो, बौद्ध धर्म स्वीकारणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय संविधानाचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांचे अनुयायी त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी लाखो लोक चैत्यभूमी, मुंबई येथे जमतात.

भारतीय संविधानाचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान समाजसुधारक आणि विद्वान होते. ते त्यांच्या कार्यासाठी आणि विद्वत्तेसाठी ओळखले जातात आणि आपले शिक्षिण ज्या मेहनतीने त्यांनी पूर्ण केले त्या शिक्षणावर त्यांना अतिशय उत्तम पगाराची नोकरी सहज लागू शकत असताना सुध्दा आपल्या समाज बांधवांसाठी त्यांची तळमळ त्यांच्या सुधारण्यासाठी त्यांनी केलेले मनोमनीचा निश्चय त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता आणि म्हणूनच त्यांनी आपल्या समाज बांधवांसाठी जे कार्य केले किंबहुना सर्वच भारतीयांसाठी जे कार्य केले तेच कार्य त्यांना देवत्व प्राप्त करु शकले अथवा सर्व समाज बांधव त्यांना महामानव संबोधु लागले आणि अश्या या महामानवाला भारत सरकारने सुध्दा भारतरत्न प्रदान करुन त्यांच्या या कार्याचा बहुमान केला कि ज्यामुळे भारतरत्न या पदवीला सुध्दा उच्चत्व प्राप्त झाले असे म्हणले तरी वावगे होणार नाही .

६ डिसेंबर १९५६ रोजी संविधानाचे जनक पंचमहाभूतांमध्ये विलीन झाले . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुण्यतिथी महापरिनिर्वाण दिन म्हणून साजरी केली जाते. ६ डिसेंबर १९५६ ची सकाळ समाजासाठी 'सूर्योदयाने नव्हे, तर सूर्यास्ताने' उजाडली, अशी तत्कालीन भावना होती. शोषित आणि वंचितांचा आधार हरपल्याची भावना समाजात पसरली आणि सर्वत्र एकच टाहो फुटला. दिल्लीतल्या '२६, अलिपूर रोड' या निवासस्थानी बाबासाहेबांचं निधन झालं. तिथून त्यांचं पार्थिव नागपूर मार्गे मुंबईत आणलं गेलं.


बाबासाहेबांचं पार्थिव मुंबईत आल्यानंतर प्रचंड गर्दी जमली. अंत्ययात्रेला 'न भूतो न भविष्यति' संख्येत लोक आले. अनुयायांच्या हुंदक्यांच्या टाहोनं मुंबापुरीचा आसमंत व्यापला गेला. सर्वत्र दुःखाची शोककळा पसरली होती आणि आपल्या या नेत्याला मानवंदना देण्यासाठी तेव्हापासून आजही अनुयायी किंवा समाजबांधव ६ डीसेंबरला त्याच स्थळाला भेट देतात ज्या स्थळावर त्यांचे पार्थिव दिल्लीतून विमानाने मुंबईत आणण्यात आले होते आणि ७ डिसेंबर १९५६ रोजी दादर येथील चैत्यभूमीवर बौद्ध धम्मानुसार अंत्यसंस्कार करण्यात आले होते. या प्रसंगी भारतभरातून लक्षावधी लोक त्यांच्या अंत्यदर्शना साठी आणि आदरांजली वाहण्यासाठी मुंबईत जमले होते.

एकूणच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाच्या वेळी सार्वजनिक विचार हा त्यांच्या अतुलनीय योगदानाचा सन्मान करणारा होता, त्यांच्या तत्त्वांचे स्मरण करणारा होता आणि त्यांच्या पश्चात निर्माण झालेल्या नेतृत्वाची चिंता व्यक्त करणारा होता.

आज ६९ वर्षे झाली तरी सुध्दा त्यांची उणीव त्यांची पोकळी सर्व समाजाला जाणवत आहे आणि ती नेहमी जाणवत रहाणारच आहे . म्हणूनच आजही ६ डिसेंबर रोजी दादर ची चौपाटी आणि त्या चौपाटीचा समुद्र सुध्दा या महान नेत्याला मानवंदना देवून या दिवशी चार नाही तर चारशे पाऊले मागे सरकतो आणि या दिवशी येथे जनसागराची भरती येते. कोणत्याही नेत्याला त्याच्या कार्याला त्याच्या विचाराला मनापासून माननारे अनुयायी , समाज बांधव अगदी अंतकरणापासून मानवंदना देणे हा संपूर्ण विश्वात एक दुर्मीळ घटना असते असेच म्हणावे लागेल.

मग या दिवशी आजही डॉ. बाबासाहेबांच्या आठवणी पुन्हा मनोमनात साठविण्यासाठी कोणी येथे येऊन आपल्याबरोबर त्यांच्या प्रतिमा घेऊन जातात , कोणी पुस्तक रुपाने त्यांना साठविण्याचा प्रयत्न करतात तर कोणी अगदी गळयात त्यांचे लॉकेट सुध्दा परीधान करणे म्हणजे आपले भाग्य समजतात. तर या दिवशी मुंबई महानगरपालिकापासून इतरही अनेक संस्था, कंपन्या, या डॉ. बाबासाहेबांच्या या अनुयायांची सेवा करण्यासाठी आपले योगदान देतात आणि हे अनुयायी सुध्दा आपल्या नेत्याने दाखविलेल्या शिस्तीचे पालन करीत कोठेही गोंधळ गडबड न करता मानवंदना देवून पुन्हा आपल्या आपल्या मार्गाने मार्गक्रमन करतात. मुंबईकर सुध्दा या आलेल्या या शिस्तप्रिय अनुयायांचे स्वागत करण्यासाठी दरवर्षी एका नव्या उत्साहात तयार असतात.

या दिवशी या महान नेत्याला खरी मानवंदना हिच असेल कि सर्वांनी त्यांची शिकवण, त्यांच्या विचारांचा जागर , **त्यांच्या शिका , संघटित व्हा आणि संघर्ष करा** या प्रेरणेची ज्योत मनात रुजविण्याची आणि ते विचार आचरणात आणण्याची आजही गरज आहे.



# चार्मस ग्रुप चा 'कमलकांत पुरस्कार' सामाजिक वारीतून इन्साफ फाऊंडेशनचे सर्वेसर्वा मुस्तफा मुजावर यांना प्रदान

श्री.संजय पोमण

नेहमीप्रमाणे वारीचा प्रवास पुण्यावरून सुरू झाला. सांगली वारीच्या वाटेवरील पहिला विसावा होता कर्तुत्ववान सावित्रीची क्रांतीज्योती झालेल्या, स्त्री शिक्षण आणि स्त्रीमुक्तीच्या जनक सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थळ नायगाव ता. खंडाळा, जि. सातारा).शासनाच्या मदतीने गावकऱ्यांनी जतन केलेले स्मारक, जीवनपट दर्शवणारे शिल्पसमूह आणि जन्मघर पाहताना, या भूमीत स्त्रीशिक्षणाचा पाया उभा करणारी क्रांतीज्योत प्रज्वलित झाली होती, या भावनेने रोमांचित झालो. क्रांतीस्तव देह झिजवणाऱ्या सावित्रीबाईच्या स्मृतिस वंदन करून वारी पुढे मार्गस्थ झाली. अवघ्या दीड दिवस शाळेशी संपर्क आलेले आपल्या शाहिरीतून संयुक्त महाराष्ट्र चळवळ जनमानसात रुजवणारे, मराठी साहित्यातील जवळपास सर्व साहित्यप्रकार सक्षमपणे हाताळणारे, ज्यांचे साहित्य रशियन भाषेत भाषांतरित झाले आणि रशियातही ज्यांचा पुतळा उभारला गेला असे उपेक्षितांचा आवाज असलेले महाराष्ट्राचे प्रतिभासंपन्न सुपुत्र लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या वाटेगाव या जन्मस्थळी वारी पोहोचली. अनेक मान्यवरांच्या सहकार्याने उभारलेल सुंदर स्मारक, शिल्पसृष्टी पाहून मन हेलावून गेल. शंभर वर्षांपूर्वी वाटेगाव ते मुंबई हा प्रवास साठे कुटुंबीयांनी पायी केला आणि गावकुसाबाहेरचा माणूस सातासमुद्रापार पोहोचला हा प्रवास थक्क करणारा आहे. अण्णाभाऊंच्या कादंबरीतील नायक 'फकीरा' यांच्या समाधीचे दर्शन घेऊन, अण्णा भाऊंच्या सुनेने प्रेमाने केलेल्या चहापानाचा आस्वाद घेत वारी पुढे मार्गस्थ झाली. तासाभरात वारी नियोजित स्थळी सांगली जिल्ह्यातील सावली बेघर निराधार केंद्रात पोहोचली. संस्थेत प्रवेश करताच तिथली वृद्ध माणसं आमच्याकडे एकटक बघत काहीशी कावरीबावरी झाली. अशातच कामात दंग असलेला, बनियन घातलेला, लांब दाढीचा, पँट परिधान केलेला, समाधानी चेहऱ्याचा एक तरुण दिसला.

पाचारणे भाऊंना पाहून तो जवळ आला. भाऊंनी ओळख करून दिली हेच... मुस्तफा मुजावर. नमस्कार करून त्यांनी आम्हाला कार्यालयात नेलं आणि धावपळ करून संस्थेतील वृद्धांसोबत प्रेमाने जेवू घातलं. जेवताना त्यांच्या धावपळीवरून हा माणूस एका जागी स्थिर बसणाऱ्यांतला नाही हे स्पष्ट जाणवलं. त्यामुळे त्यांना प्रेमाने दम देऊन एका जागी बसवून त्यांचा कार्यप्रवास ऐकून घेतला. मुस्तफा यांचा जीवन प्रवास त्यांच्या ओघवत्या वाणीमधून ऐकताना सर्वजण अचंबित झाले.

मुस्तफा इलाही मुजावर, दहावी नापास मुलगा, पाणटपरी चालवणारा, एका टप्प्यावर कुख्यात गुंड म्हणून नावारूपाला आलेला, विषारी-बिनविषारी साप सहज पकडणारा, अंगावर काटा आणणारा जीवन प्रवास. अर्धपोटी राहून उपाशी माणसाला खाऊ घालण्याचा वडिलांचा संस्कार, आदरणीय बाबा आमटे यांची प्रेरणा आणि रस्त्याच्या कडेला पडलेल्या एका वृद्ध महिलेची सुश्रुषा करताना मिळालेलं समाधान असे अनेक क्षण त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले. पुढे या तरुणाने जाती-धर्माच्या भिंती ओलांडून मानवसेवेचं मंदिर उभारलं. सेवेतून मानवधर्माची पताका फडकवली. मुस्तफाचे अनुभव सुन्न करणारे आहेत. समाजातील सर्व स्तरांतील सामान्य, निवृत्त अधिकारी, प्रतिभावंत, श्रीमंत, आजारी आयुष्याच्या सायंकाळी घरच्यांनी नाकारलेल्या वृद्धांची कहाणी ऐकताना मन हेलावून गेलं.

जिसका कोई नाही... उसका मुस्तफा है, या सगळ्यांचा मुस्तफा मुलगा झाला, प्रसंगी पालक झाला. आजवर शेकडो वाटचुकलेल्या वृद्धांना घरी पोहोचवलं, असंख्यांना गंभीर आजारातून वाचवून चांगलं आयुष्य दिलं, आश्रय दिला, आधार दिला, मायेचं छप्पर दिलं. इथल्या प्रत्येक वृद्धाची जीवनकहाणी वेगळी,कोणाला काही आठवत नाही, कोणाला आठवायचंच नाही. हा अवलिया रक्तबंबाळ माणसांची सुश्रुषा करतो, केस वाढून पशूसारखे झालेले माणसे माणसात आणतो, भुकेल्याला अन्न देतो, बेघराला निवारा देतो. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांच्या जगण्याला 'इन्साफ' देण्याचा प्रयत्न करतो. मुस्तफा मुजावर या ध्येयवेड्या तरुणाने आपल्या जीवनाची समिधा अर्पण करून उभारलेलं मानवसेवेचं मंदिर 'इन्साफ फाउंडेशन' या मानवसेवेच्या मंदिराला भेट देणारी ही आमची 'सामाजिक वारी'.

मात्र अशा सामाजिक वारीने डोळे उघडतात. श्री.लक्ष्मीकांत पाचारणे यांनी स्थापन केलेल्या चार्मस ग्रुपच्या माध्यमातून आजवर २१ हून अधिक सामाजिक संस्थांना प्रत्येकी एक लाख रुपयांचा '**सामाजिक कर्तव्यनिधी**', विविध नामवंतांची पुस्तके, त्यांच्या शुभ हस्ते देऊन १०वी, १२वी तील गुणवंतांचा सत्कार, लक्षावधी रुपयांची पुस्तक स्नेहभेट, व्यसनमुक्ती, शैक्षणिक मदत

अशा अनेक उपक्रमांसोबत राबवला जाणारा 'सामाजिक वारी' हा अभिनव उपक्रम गेल्या वर्षीपासून या वारीत 'कमलकांत पुरस्कार' हा नवा अध्याय जोडला गेला. रुग्णसेवेला जीवन अर्पण करणाऱ्या स्व. सौ. कमल लक्ष्मीकांत पाचारणे आणि ज्येष्ठ साहित्यिक स्व. डॉ. आनंद यादव यांच्या स्मृतीप्रित्यर्थ समाजकार्य करणाऱ्यां संस्था, व्यक्तींच्या सद्गुणांची पूजा बांधणारा हा पुरस्कार.याच सामाजिक वारीमध्ये सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असं स्वरूप असलेला यंदाचा '**कमलकांत पुरस्कार**' इन्साफ फाउंडेशनचे श्री. मुस्तफा इलाही मुजावर यांना प्रदान करण्यात आला. आजवरच्या कार्याचा परिपाक म्हणून मुस्तफा यांनी भेट मिळालेल्या २० गुंठे जागेत प्रत्येक निराधार वृद्धांच्या स्मृती जपणारं 'स्मृतिगंध सेवालय' विकसित करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. मुस्तफा यांची धडपड, जिद्द आणि माणुसकी यांच्या बळावर त्यांचं स्वप्न नक्कीच साकार होईल. संस्थेत येणाऱ्या निराधार, आजारी, मनोरुग्ण वृद्धांना मुस्तफा 'मनोयात्री' म्हणून संबोधतो. या मनोयात्री लोकांची अखेरची जीवनयात्रा आनंद यात्रेमध्ये रूपांतरित करण्याचं मुस्तफाचे हे व्रत. माणसांना आसरा देणं सोप्प पण शेवटच्या क्षणापर्यंत 'इन्साफ' करणं हीच इन्साफ फाउंडेशनची ताकद. म्हणूनच खऱ्या अर्थाने कमलकांत पुरस्कारालाही इन्साफ मिळाला.

श्री. पाचारणे यांनी जनसेवेच्या मंदिरांमध्ये पंढरपूर पाहत सामाजिक वारी सुरू केली हेच व्रत जोपासलं. हीच तीर्थस्थानं आजवर पूजली. हा संस्कार समाजात रुजावा, या वारीत आत्मबोधाबरोबर आत्मप्रबोधन घडावं आणि त्या प्रबोधनातून मानवसेवेचा संस्कार दृढ व्हावा या हेतूने अनेक वर्षे आर्थिक झळ सोसत ही सामाजिक वारी सुरू आहे. अध्यात्मिक वारीइतकीच ही सामाजिक वारी महत्त्वाची आहे. ही वारी घडली तरीच 'भुता परस्परे जडो मैत्र जिवांचे' हा माऊलींना अभिप्रेत समाज निर्माण होईल.

**दिंडी चालक :** श्री. लक्ष्मीकांत पाचारणे, **संस्थापक :** चार्मस ग्रुप
**माजी राज्याध्यक्ष :** महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना

# शासकीय धोरण/योजना

## पर्यटन संचालनालयामार्फत महिला केंद्रीत "आई धोरण"

भारतातील आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्रातील विविध आकर्षणे प्रदर्शित करून राज्यातील पर्यटनाला प्रोत्साहन आणि विकास करण्यासाठी समर्पित आहे. महाराष्ट्र शासनाचे प्राथमिक उद्दिष्ट पर्यटनाच्या पायाभूत सुविधा वाढवणे, धोरणात्मक योजना तयार करणे आणि शाश्वत पर्यटन उपक्रम राबविणे आहे. पर्यटकांना एकसंध आणि आनंददायी अनुभव मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाचा पर्यटन संचालनालय प्रवास मार्गदर्शक आणि माहिती केंद्रांसह व्यापक पर्यटन सेवा प्रदान करण्याचे उद्दिष्ट नेहमी ठेवत असते. गणेशोत्सव आणि हिंदवी स्वराज्य महोत्सव यांसारखे सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि मनोरंजक कार्यक्रम आणि उत्सव आयोजित करून आणि प्रोत्साहन देऊन, पर्यटन संचालनालय महाराष्ट्राचा अद्वितीय वारसा आणि चैतन्यशील संस्कृती अधोरेखित करण्याचा प्रयत्न करत असते.

महाराष्ट्रात अजिंठा आणि वेरूळ लेण्यांसारख्या युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळे, महाबळेश्वर आणि लोणावळासारख्या नयनरम्य हिल स्टेशन आणि मुंबई आणि पुणे सारख्या गजबजलेल्या शहरी केंद्रांसह पर्यटन स्थळांचा समृद्ध संग्रह आहे. पर्यटन संचालनायाचे प्रयत्न इको-टुरिझम आणि साहसी पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी आहेत, जेणेकरून आपले नैसर्गिक लँडस्केप आणि साहसी उपक्रम सुलभ आणि शाश्वत राहतील. शिर्डी आणि सिद्धिविनायक मंदिरासारख्या तीर्थक्षेत्रांना धार्मिक पर्यटनाला चालना देऊन, पर्यटन संचलनालय विविध प्रकारच्या नागरीकांच्या आवडी आणि पसंती पूर्ण करतो.

आई हा शब्द उच्चारताच मनात जी ममता व वात्सल्य जागृत होते. त्याचे सशक्तीकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासन, त्याच अनुशगांने संचालनालयसामोर आलेल्या पर्यटन क्षेत्रातील निगडीत समाजाच्या काही व्यवसायिकांना आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी **आई** हे पर्यटन धोरण संचालनालय राबवित आहे.

पर्यटन क्षेत्राशी निगडित असलेले प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रकारचे व्यवसाय, उद्योग सुरू करण्यासाठी पर्यटन विभाग महिलांना १५ लाखांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देणार आहे.

कॅरॅव्हॅन, बिचशॅक, साहसीपर्यटन (जमीन व हवाजल), पर्यटक सुविधा केंद्र, कृषी पर्यटन केंद्र, होमस्टे, निवास व न्याहरी, रिसॉर्ट, मोटेल, हाऊसबोट, टेंट, ट्रीहाऊस व्होकेशनल हाऊस, पर्यटन व्हिला, वूडन कॉटेजेस, पॉडस, महाभ्रमण, रेस्टॉरंट, उपहारगृह, फास्टफुड, महिला चलित कॉमन किचन, कॅफे, बेकरी, टुर ऑपरेटर, ट्र्व्हलएजंट, टुर मार्गदर्शक, कुज, टुर अॅन्ड ट्र्व्हल एजन्सी, आर्ट अँड क्राफ व्हिलेज, टुरिस्ट ट्रान्स्पोटर्स ऑपरेटर, हाऊसबोट, ई व्हेहिकल्स रिक्षा मोटरसायकल बस व इतर चारचाकी वाहने, आदिवासी निसर्ग पर्यटनाशी संबंधित प्रकल्प, मेडीकल पर्यटन, वेलनेससेंटर, आयुर्वेद योगा केंद्र, हॅन्डक्राफट्रस, सोव्हिनिअर आर्ट अॅन्ड कल्चर, स्थानिक उत्पादनाची विक्री केंद्रे, धार्मिक स्थळीनर्माल्य, प्रसाद विक्री करणारी मान्यता प्राप्त दुकाने, विविध खाद्यपदार्थ विक्रेते, इव्हेंट मॅनेजमेंट व इतर पर्यटन व्यवसाय प्रकारच्या पर्यटन व्यवसायांचा यामध्ये समावेश आहे.

आई धोरणा अंतर्गत पर्यटन संचालनालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलती महिलांना पर्यटन क्षेत्रातील व्यवसाय उभारणी करिता किंवा पर्यटन क्षेत्रात कार्यरत असलेल्या पर्यटन व्यवसायाकरिता बँकेने रू. १५ लक्ष पर्यंतच्या मर्यादित कर्ज मंजूर केलेल्या महिलेने वेळेत कर्जाचा हप्ता भरल्यास हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२% च्या मर्यादेत) कर्ज परतफेड किंवा ७ वर्षे कालावधीपर्यंत किंवा व्याजाची रक्कम रू. ४.५० लक्ष मर्यादपर्यंत जे आधी घडेल तो पर्यंत व्याजाचा परतावा पर्यटन संचालनालय व्याज परतावा स्वरूपात खालील अटींच्या अधीन राहून अदा करेल.

१) पर्यटन व्यवसाय महिलांच्या मालकीचा व त्यांनी चालविलेला असला पाहिजे. २) महिलांच्या मालकीच्या व्यवसायामध्ये ५०% व्यवस्थापकीय व इतर कर्मचारी महिला असणे आवश्यक आहे. ३) पर्यटन व्यवसायाकरिता आवश्यक सर्व परवानग्या प्राप्त असाव्यात. ४) लाभार्थींचे कर्ज खाते आधार लिंक असले पाहिजे.

५) कर्जाचे हप्ते वेळेत भरले पाहिजे.

६) लाभार्थी, पर्यटन व्यवसाय व कर्ज देणारी बँक महाराष्ट्रात स्थित असणे आवश्यक.

अधिका माहितीसाठी कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते दुपारी ६ पर्यंत : उपसंचालक कार्यालय विभागीय पर्यटन कार्यालय आयबरॅक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे ४११००१. फोन : ८०८००३५१३४ / ०२०२९९००२८९ येथे संपर्क करावा. वेबसाईट : www.maharashtratoutism.gov.in

MAHARASHTRA TOURISM

# वैश्विक किर्तीचा महामानव... डॉ. आंबेडकर

डॉ. बबन जोगदंड, विभाग प्रमुख विस्तार व सेवा विभाग, बार्टी, पुणे. मो. ९८२३३३८२६६

जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात तडजोड केली असती तर कदाचित ते या देशाचे प्रधानमंत्रीही बनले असते. आपल्या विद्वतेमुळे खूप पैसा कमावून गर्भश्रीमंतही झाले असते, पण त्यांनी याला ठोकर देऊन हजारो वर्षे गुलामगिरीचे आयुष्य जगणाऱ्या माणसांना त्यांची गुलामीची बंधने तोडून एक माणूस म्हणून माणसात आणण्याचे काम केले. म्हणूनच त्यांचा आज अवघ्या विश्वात बोलबोला आहे. १४ एप्रिलला त्यांची जयंती जगातले अनेक देश उत्साहीपणे साजरी करतात, त्यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल जाणून घेतात. त्यांच्या कार्याचा अभ्यास करतात. यामुळे ते केवळ भारत देशापुरते मर्यादित नसून, ते वैश्विक किर्तीचे महामानव ठरतात.

डॉ. आंबेडकर म्हणतात, मी जेवढी गरीबी अनुभवली तेवढी गरीबी कदाचित भारतातील अन्य एकाही नेत्याने अनुभवली नसेल. मी गरीब असूनही मी कधी गरिबीचे कारण सांगून माझा स्वाभिमान व माझे आंदोलन कधीच कमी पडू दिले नाही. एवढी गरीबी असूनही मी पैशांसाठी कधीच विकलो गेलो नाही. त्यामुळेच तर बाबासाहेब प्रामाणिक पणे इथल्या विषमतावादी देशात वंचित, उपेक्षितांसाठी भरीव असे कार्य करू शकले. त्यांच्या कार्याला जगाच्या इतिहासात तोड नाही.

डॉ. आंबेडकर जेव्हा इंग्लंडहून उच्च शिक्षण घेऊन भारतात परतले, तेव्हा त्यांना भारतात जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधिशांचे पद देऊ करण्यात आले होते. तरी त्यास त्यांनी नकार दिला. ते म्हणतात, जर मी ही नोकरी पत्करली असती, तर मला सुखवस्तुपणाची हमी मिळाली असती, पण माझ्या सहबांधवांच्या कल्याणाचे व उन्नतीचे प्रयत्न करण्याचे माझ्या आयुष्याचे ध्येय मला सफल करता आले नसते. या एकाच कारणामुळे मी हा पर्याय नाकारला. नंतर १९४२ ला पुन्हा त्यांच्यासमोर उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदाच्या नियुक्तीचा प्रस्ताव आला होता. त्यांनी जर ही नोकरी पत्करली असती, तर ते खूप आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन आपले जीवन अगदी ऐषोआरामात जगले असते; परंतु त्यांनी हाही प्रस्ताव धुडकावला व याबाबत ते म्हणाले होते, मला जेव्हा माझ्या आयुष्याचा अर्थ समजू लागला तेव्हापासून मी माझ्या जीवनाचे एक तत्त्व सतत अनुसरत आलो. ते म्हणजे माझ्या समाजबांधवांची व देशाची सेवा कारणे एवढचं!

बाबासाहेबांनी आपल्या वंचित, उपेक्षित समाजाबरोबरच देशातील इतरांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठीचे ध्येय तसूभरही कुठे हटविले नाही. म्हणूनच आज या देशातील वंचित, बहुजन अभिमानाचे, उच्चप्रतीचे जीवन जगत आहेत. त्यांची विद्वत्ता एवढी अफाट होती की, भले भलेही त्यांच्या विद्वत्तेपुढे नतमस्तक होत असत. त्यांचा तब्बल ३२ विषयांचा व्यासंग होता. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, राजकारण, पत्रकारिता, कायदा, धर्मशास्त्र, नितीशास्त्र, व्यापार, साहित्य, मानवंशशास्त्र, घटनाशास्त्र अशा कितीतरी शास्त्रांत त्यांचे नैपुण्य होते. ५०० ग्रॅज्युएटच्या तोडीचा त्यांचा अभ्यास होता. त्यांनी ५५ ग्रंथांचे लेखन, संपादन केले होते. म्हणूनच त्यांना विसाव्या शतकातील सर्वांत बुद्धीमान विद्वान म्हणून ओळखले जाते. आपल्या विद्वत्तेच्या बळावर त्यांनी अस्पृश्य, महिला, शेतकरी, कामगार, सरकारी नोकरदार यांच्यासाठी प्रचंड कार्य केले. अस्पृश्यतेचा ५००० वर्षांचा इतिहास त्यांनी अवघ्या ४० वर्षात पुसून टाकून एक नवा इतिहास रेखाटला. १३ ऑक्टोबर १९२९ ला पुण्यात सनातन्यांची एक सभा झाली होती. त्या सभेत अस्पृश्यांच्या चळवळींची खिल्ली उडविणारे भाऊसाहेब भोपटकर यांनी अस्पृश्यांना दोनशे वर्षांनी म्हणजे इ.स. १९२९ साली मंदिर प्रवेशाचा हक्क मिळेल, असे भाकित केले होते. मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे भाकीत खोटे ठरवून सर्वांना मंदिर प्रवेश, सार्वजनिक पाणवठे खुले करून दिले. यासाठी त्यांना मात्र प्रचंड संघर्ष करावा लागला. नाशिक येथील काळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रह व महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह हे त्याचेच द्योतक आहे. त्यांनी अशी महान क्रांती केली की, जगाच्या इतिहासात अशी दुसरी मानवमुक्तीची क्रांती झालीच नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले लोकहिताचे, समाजहिताचे काम आयुष्यभर करीतच गेले. ते यासाठी अठरा अठरा, बावीस-बावीस तास अभ्यास करायचे. त्यांच्या या प्रचंड अभ्यासामुळे, विद्वत्तेमुळेच त्यांच्याकडे भारताच्या राज्यघटनेची जबाबदारी आली आणि ती त्यांनी लिलया पेलून भारतीय समाजव्यवस्थेत एक नवा आयाम निर्माण केला. २ वर्षे ११ महिने १८ दिवस या राज्यघटनेवर त्यांनी कष्ट घेतले म्हणूनच भारताची राज्यघटना जगात श्रेष्ठ ठरली. जेव्हा ते राज्यघटना लिहित होते तेव्हा अन्य काही शेजारील देशातील विद्वान म्हणत की, आंबेडकर जी भारताची राज्यघटना लिहित आहेत, ती जास्त काळ थोडीच टिकणार आहे. कारण भारत हा महाकाय असा देश आहे. येथे विविध धर्म, परंपरा, जाती, प्रथा व प्रचंड लोकसंख्या आहे. त्यामुळे जास्तीत जास्त ६ महिने ही राज्यघटना टिकेल. पण बाबासाहेब आबेडकर एवढे ज्ञानी होते की, त्यांनी आपला सगळा जीव यामध्ये ओतून सर्वसमावेशक, सर्व हितकारक अशी राज्यघटना निर्माण केली की, ती आज दिमाखाने डोलते आहे. जे असे म्हणणारे होते, तिथल्या राज्यघटना मात्र अल्पजीवी ठरल्या. म्हणूनच त्यांच्या या अलौकिक कार्याची दखल अनेक देशांनी घेतली.

त्यांच्या वैश्विकतेबद्दल एका युरोपियन प्रवासी महिलेने १९३१ मध्ये म्हटले होते की, डॉ. आंबेडकर हा युवक भारतीय इतिहासाची नवी पाने लिहित आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ दलितांचे नेते नव्हते, केवळ भारत देशाचे नेते नव्हते तर ते संपूर्ण जगाचे नेते होते. श्रीलंकेचे नेते विजय राजपक्षे म्हणतात, भारताने स्वातंत्र्य लढ्यासाठी लढा दिला, तर डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायासाठी लढा दिला. त्यांनी लिहिलेली राज्यघटना जगात आदर्श आहे. त्यांनी लिहिलेली पुस्तकेही जगभर वाचली जातात.

गव्हर्नर रिचर्ड कॅसे यांनी म्हटले होते की, डॉ. आंबेडकर म्हणजे बुद्धीमत्तेचा आणि ज्ञानाचा मूळ झरा आहे. डॉ. बेव्हरले निकोल्स यांनी असे म्हटले आहे की, डॉ. आंबेडकरांच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द म्हणजे पिस्तुलातून उडणारे बार आहेत. अशी बाबासाहेबांची ख्याती परराष्ट्रांतील उच्चभ्रू मंडळींनी वर्णली आहे. यावरून त्यांच्या लौकिकत्वाची वैश्विक प्रचिती येते.

डॉ. आंबेडकर हे प्रचंड अभ्यास करायचे. ते स्वतःला अजन्म विद्यार्थीच संबोधत असत. म्हणून त्यांनी पुस्तकांसाठी घर बांधले. त्यांच्या वैयक्तिक संग्रहालयात तीस हजारांहून अधिक ग्रंथ होते. त्यांची लिखाणाची शैली व त्यांचे अक्षर तर दृष्ट लागेल असेच होते. त्यांची जडणघडण जरी गरीबीत झाली असली तरी त्यांचे राहणीमानही राजेशाही, उच्चभ्रूसारखे होते. परदेशी पोषाख ते नेहमी वापरत असत.

प्रसिद्ध विचारवंत डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घातलेली संस्कृती सहजच भारतीय होते आणि त्याहून अधिक ती वैश्विक संस्कृती होते. कारण या संस्कृतीच्या प्रसरणशील महात्म्य मूल्यांनी जात, धर्म आणि प्रदेश अशा सर्वच प्रकारच्या भिंती नष्टच केल्या आहेत. म्हणून लंडनच्या म्युझियममध्ये कार्ल मार्क्ससोबत त्यांची प्रतिमा आहे. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा बाबासाहेबां संदर्भात म्हणाले होते की, जर बाबासाहेब आमच्या देशात जन्माला आले असते, तर आम्ही त्यांना सूर्य म्हटले असते. युनोला सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे कौतुक आहे. म्हणून दरवर्षी युनोमध्ये डॉ. आबेडकरांची जयंती साजरी होते. जगातील अनेक राष्ट्र डॉ. आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेतात, ही त्यांच्या वैश्विकपणाची पावतीच होय.

### पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या मतदार यादी नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम

पुणे- प्रारुप मतदार यादीनुसार दोन लाख ७२ हजार पदवीधरांची व ४४ हजार शिक्षकांची नाव नोंदणी

पुणे विभागातील पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या नव्याने मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारुप मतदार यादीनुसार पुणे विभागात २ लाख ७२ हजार ६१ पदवीधरांची तर ४४ हजार २३३ मतदारांची नोंदणी झाली आहे.

या २०२५ च्या कार्यक्रमांतर्गत प्रारुप मतदार यादीनुसार पदवीधर मतदार संघासाठी पुणे जिल्ह्यात ५४ हजार ८१० मतदार नोंदणी, सातारा-३५ हजार ८७९, सोलापूर- ३० हजार ४७२, कोल्हापूर- ८० हजार १८०, सांगली- ७० हजार ७२० अशी एकूण २ लाख ७२ हजार ६१ इतकी नोंदणी झाली आहे. तर शिक्षक मतदार संघासाठी पुणे- ९ हजार ७७८, सातारा- ८ हजार ४९२, सोलापूर- ११ हजार १९८, कोल्हापूर- ८ हजार ६३१ व सांगली- ६ हजार १३४ अशी एकूण ४४ हजार २३३ मतदारांची नोंदणी झाली आहे.

२०२० मध्ये पदवीधर मतदार संघासाठी ४ लाख २० हजार ८९६ इतकी तर शिक्षक मतदारांची ७२ हजार १९० इतकी नोंदणी होती. गेल्या निवडणुकीपेक्षा यावर्षी आतापर्यंत कमी मतदार नोंदणी झाली आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी मतदार नोंदणीची प्रसिद्धी व जागृती करुन जास्तीत जास्त पात्र मतदारांना नोंदणीसाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले आहे.

मतदार याद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रमांतर्गत १८ डिसेंबर २०२५ पर्यंत मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या पदनिर्देशित अधिकारी किंवा संबंधित विधानसभा मतदार संघाचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे दावे व हरकती दाखल करता येतील. नवीन नाव नोंदणीचा दावा दाखल करण्यासाठी पदवीधरांना नमुना क्रमांक १८ व शिक्षकांना नमुना क्रमांक १९ द्वारे याच कालावधीत दावा दाखल करता येईल. प्रारुप मतदार यादीतील नावांबाबत आक्षेप असल्यास नमुना क्रमांक ७ व यादीतील नोंदीमध्ये दुरुस्तीसाठी नमुना क्रमांक ८ दाखल करता येईल. दावे व हरकतींचा कालावधी संपल्यानंतर ५ जानेवारी २०२६ रोजी दावे व हरकती निकाली काढून पुरवणी यादी तयार करणे व छपाईची कार्यवाही करण्यात येईल. पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या यादीची अंतिम प्रसिद्धी १२ जानेवारी २०२६ रोजी केली जाणार आहे.

सारस्वत आर्टस् ॲन्ड प्रिटंस् तर्फे
सामाजिक आढावा
या साप्ताहीकास पुढील वाटचालीस
हार्दीक शुभेच्छा



वितरक व पत्रकार नेमणे आहे, तरी इच्छुकांनी खालील इमेल वर संपर्क करावा
E-mail :samajikaadhawa@gmail.com

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्य कोठेही नाही